# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0215 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/08/2019 23:14 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 06/08/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/08/2019
**Time From (वेळेपासून):** 11:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/08/2019 **Time (वेळ):** 23:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/08/2019 23:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सी पी आर हास्पीटलचे ,दगडी इमारतीमधील कार्यालयामध्ये, व कासारी इमारतीमधील कार्यालय,सीपीआर हॉस्पीटल कोल्हापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बिरू राऊ शेळके

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** राऊ शेळके

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | संभाजी चौक, पिष्टे गल्ली,कागल,कागल,कागल,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | संभाजी चौक, पिष्टे गल्ली,कागल,कागल,कागल,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604125226

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जयवंत शंकर पाटील | | पालक का नाम : शंकर पाटील | 1. योगेष्वरी कालनी, पाचगांव रोड, कोल्हापूर,करवीर ,करवीर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रुपये 1,00,000/ | 100,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 100,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक- 06/08/2019 मी श्री. बिरु राऊ शेळके, वय वर्षे-42, व्यवसाय-कापड पुरवठादार,रा. संभाजी चौक, पिष्टे गल्ली, कागल,ता.कागल,जिल्हा- कोल्हापूर,मोबाईल नंबर- 9604125226. समक्ष हजर राहून देतो फिर्यादी जबाब असा की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबिय यांचेसह राहाणेस आहे. माझी श्री बिरदेव घोंगडी उत्पादक सहकारी संस्था, कागल येथे संस्था असून सदर संस्थेचा मी अध्यक्ष आहे. सदर संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाकडे संलग्न सभासद असलेल्या संस्थांना कापड, हास्पीटलसाठी लागणारे कापड इत्यादी वस्तंूचा पुरवठा करतो. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाच्या निर्धारित केलेल्या दराप्रमाणे हास्पीटल क्लाथ(मांजरपाट कापड) तसेच हास्पीटलमध्ये लागणारे अन्य बाबीसांठी कापड पुरवठा करणेचे काम आमचे संस्थेतर्फे यंत्रमाग महामंडळाशी संलग्न असलेल्या भैरवनाथ यंत्रमाग सहकारी संस्था, इचलकरंजी यांना पुरवठा करतो. भैरवनाथ संस्थेकडून यंत्रमाग महामंडळ यांना कापड पुरवठा केला जावून त्याची बीले यंत्रमाग महामंडळाकडून संबंधीत हास्पीटल येथे पाठविली जातात. तदनंतर यंत्रमाग महामंडळाकडून संबंधीत हास्पीटल येथे पुरवठा केलेल्या मालाबाबत संबंधीत हास्पीटलकडून त्याचे बील यंत्रमाग महामंडळ यांचे नावे जमा होते. त्यानंतर यंत्रमाग महामंडळाकडून नफा कपात करुन उर्वरित बिलाची रक्कम भैरवनाथ यंत्रमाग सहकारी संस्था, इचलकरंजी यांचे नावे जमा केली जाते. तदनंतर भैरवनाथ यंत्रमाग सहकारी संस्था, इचलकरंजी यांचेकडून त्यांचे कमीशन वजा करुन उर्वरित बील आमचे बिरदेव घोंगडी उत्पादक सहकारी संस्था, कागल यांचे नावे जमा होते. छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर(सी.पी.आर.हास्पीटल,कोल्हापूर) यांचेकडून मृतदेहांसाठी आवश्यक असणारे सफेद मांजरपाट कापड 6000 मीटर कापड पुरवठा करणेसाठी यंत्रमाग महामंडळ, विभागीय कार्यालय,इचलकरंजी यांना आर्डर प्राप्त झाली होती. सदर आर्डरनुसार आमचे बिरदेव संस्थेतर्फे भैरवनाथ यंत्रमाग संस्थेस कापड पुरवठा करणेत आला. तसेच भैरवनाथ यंत्रमाग संस्थेतर्फे यंत्रमाग महामंडळ यांना कापड पुरवठा करणेत आला. त्यानंतर महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, शाखा इचलकरंजी यांनी 6000 मीटर कापड सीपीआर हास्पीटल कोल्हापूर यांना पुरवठा केले. त्याबाबत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ लि.शाखा इचलकरंजी यांचेकडून बील तयार करुन लिनन किपर श्री.पाटील यांचेकडे सादर केली आहेत. तसेच हास्पीटलसाठी लागणारे सर्जन गाऊन, कायर गाद्या इत्यादी साहीत्य पुरवठा करणेबाबतचा प्रस्ताव यंत्रमाग महामंडळ मार्फत सी.पी.आर.हास्पीटल, कोल्हापूर येथे मी सादर केला आहे. सीपीआर हास्पीटल येथील लिनन किपर पाटील यांनी पुरवठा केलेल्या कापडाचे बील मंजुरीसाठी कोषागार कार्यालयाकडे पाठवितो. तसेच पुढील कापडाची आर्डर देतो असे सांगून माझेकडे 4,00,000/-रुपयेची मागणी केली. त्याबाबत मी दि.05/08/2019 रोजी अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत साो यांना भेटून त्यांचेकडे लिनन किपर जयवंत पाटील यांचेविरुध्द तक्रारी अर्ज दिला. श्री.बुधवंत साो यांनी मला व दोन्ही पंचांना सी.पी.

आर.हास्पीटल,कोल्हापूर येथील लिनन किपर जयवंत पाटील हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. श्री.बुधवंत यांनी मला लिनन किपर जयवंत पाटील आता हास्पीटल येथे आहेत काय? याबाबत विचारणा केली असता मी ते आता हास्पीटलमध्ये नसून त्यांचे पाचगांव येथील घरी आहेत असे सांगितले. तेव्हा श्री.बुधवंत यांनी पाटील यांचे लाच मागणीचे पडताळणी करीता तक्रारदार यांना पंचासमवेत लिनन किपर जयवंत पाटील यांचे पाचगांव रोडवरील राहाते घरी,कोल्हापूर येथे पाठविणेचे ठरविले. त्यानुसार मी,दोन्ही पंच, श्री.बुधवंत सा◌ो व त्यांचा स्टाफ असे आम्ही सर्वजन शासकीय टाटा सुमोतून पाचगांव रोडवरील पाटील यांचे घराजवळ गेलो. तेथे श्री.बुधवंत सा◌ो यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड घालुन मला व पंचांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री.बुधवंत सा◌ो यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे शर्टचे आतील बाजूस ठेवला व मला आणि पंच न.1 श्री.तुराळे यांना पाटील यांची भेट घेणेसाठी पाठविले. मी पाटील यांची त्यांचे घरी भेट घेवून बिलाचे कामाबाबत चर्चा करुन श्री.बुधवंत थांबलेल्या ठिकाणी परत गेलो. तेथे श्री.बुधवंत सा◌ो यांनी माझेकडील डिजीटल रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला. मी पाटील यांचे घरी पंचासमवेत गेल्यानंतर तेथे माझी व पाटील यांचेत कापड पुरवठा केलेल्या बीलाबाबत चर्चा झाली. त्यावेळी पाटील यांनी सी.पी.आर.हास्पीटल, कोल्हापूर येथे मृतदेहांसाठी आवश्यक असणारे सफेद मांजरपाट कापड पुरवठा केलेबाबतचे बील मंजूरीसाठी कोषागार कार्यालय कोल्हापूर येथे पाठविलेबाबत व हास्पीटलसाठी आवश्यक असणारे कपडे, इतर साहीत्य पुरविणेची आर्डर देणेसाठी रु.4,00,000/- रक्कमेची मागणी करुन त्यापैकी रु.1,00,000/- रक्कम दि.06/08/2019 रोजी फोन करुन घेवून येणेस सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजन अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे परत आलो. तेथे श्री.बुधवंत सा◌ो यांनी पडताळणी पंचनामा केला आहे..आज रोजी मी सकाळी श्री.बुधवंत यांनी दिलेल्या सुचनेनुसार अन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कार्यालयात हजर झालो. तेथे मी श्री.बुधवंत यांचे सुचनेनुसार पाटील यांना मोबाईलवर फोन करुन ते सी.पी.आर.हास्पीटल येथे आहेत काय? याची विचारणा केली. तेव्हा त्यांनी मी हास्पीटल येथे असून भेटणेस या असे सांगितले. त्यानुसार श्री. बुधवंत यांनी सी.पी.आर.हास्पीटल,कोल्हापूर येथे सापळा कारवाई आयोजित करणेचे ठरविले. श्री.बुधवंत यांनी त्यांचे कार्यालयात सापळापूर्व पंचनामा कारवाई सुरु करत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी लिनन किपर जयवंत पाटील यांना देणेसाठी म्हणून 1,00,000/- रुपये रक्कम श्री.बुधवंत यांचेकडे हजर केली. त्यांनी नमुद नोटांचे नंबर्स लिहून घेवून त्या नोटांना टेबलवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून त्यावर पोहेका खोत यांचेमार्फत अन्थ्रासिन पावडर लावून घेतली. त्यावेळी लाच रक्कम माझे पंटचे उजवे खिशात पोहेका खोत यांचे मार्फतीने ठेवले. तेव्हा जयवंत पाटील यांची भेट घेवून त्यांना लाच रक्कम द्यावी व त्यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे पंटचे खिशातील नपकीन तोंडावरुन फिरवावी म्हणजे जयवंत पाटील यांनी लाच स्विकारलेबाबतचा तो इशारा असल्याचे समजण्यात येईल अशी श्री.बुधवंत यांनी सुचना दिली. श्री.बुधवंत यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर माझे गळयात षर्टच्या आत अडकवून चालु केला व मला आणि पंच नं.1 श्री. तुराळे यांना ए.सी.बी.कार्यालयापासून जवळच असलेल्या सी.पी.आर.हास्पीटल,कोल्हापूर येथे 11.37 वा.पायी चालत रवाना केले. मी जाताना पाटील यांना मोबाईलवर फोन करुन त्यांना भेटणेसाठी येत असलेचे सांगितले. मी पंचासह सीपीआर हास्पीटलचे दगडी इमारतीमध्ये गेलो. तेथील सिव्हील सर्जन यांचे केबीनशेजारील व्हरांडयातून मागील बाजूस असलेल्या कासारी इमारतीमधील पाटील यांचे आफिसकडे जात असताना तो मला व्हरांडयात भेटला. त्याठिकाणी आमची इतर चर्चा होत असताना पाटील यांनी उजवे हाताचे बोटाचे इशायाने माझेकडे लाच रक्कमेची मागणी केली. त्यानुसार मी माझे पंटचे उजवे खिशातून लाच रक्कम 1,00,000/- काढून पाटील यांना दिली. ती त्यांनी त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पंटचे उजवे खिशात ठेवली. त्यानंतर आमचेत पुन्हा थोडावेळ चर्चा झालेवर पाटील हा अचानक कासारी इमारतीकडे निघून गेला. पाटील याने पैसे स्विकारलेचा मी श्री.बुधवंत यांना इशारा केला. पाटील हा लाच रक्कमेसह अचानक तेथून निघून गेले◌ेने व त्यास लाच रक्कमेसह पकडून द्यायचे असलेने मी व पंच श्री.तुराळे असे कासारी इमारतीकडे गेलो. त्यावेळी आमचे मागोमाग सापळा पथक आले. मी पाटील यांचे आफिसकडे गेलो. त्यावेळी आफिसला कुलूप होते. पाटील कोठे दिसला नाही म्हणून मी त्याचे मोबाईलला फोन करुन तुमचेकडे पैशाचे जादा बंडल आले आहे, तुम्ही कोठे आहात? याबाबत विचारले असता त्याने मला पोर्चजवळ या असे सांगितले. म्हणून मी पोर्चजवळ गेल्यावर तेथे पाटील आला असता, मी सापळा पथकास पाटील दाखवून ताब्यात घ्या असे सांगितले. त्यानंतर श्री.बुधवंत सा◌ो व सापळा पथकाने पाटील यास पकडून पाटील याचे आफिसचे शेजारील भांडार कक्षात घेवून गेले. तेथे पाटील यांचे कब्जातील लाच रक्कम रु.1,00,000/- श्री. बुधवंत यांनी ताब्यात घेतली आहे. तेव्हा बुधवंत सा◌ो यांनी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या.मुंबई कार्यालय इचलकरंजी यांची बीलासंबंधीची कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. त्यानंतर श्री.बुधवंत सा◌ो यांनी पाटील याला ताब्यात घेतलेवर आम्ही सर्वजन शासकीय टाटा सुमो गाडीतून ए.सी.बी.कार्यालयात गेलो. परंतू तेथे लाईट नसलेने आम्ही सर्वजन कसबा बावडा येथील मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयातील अन्टी करप्शन ब्युरो आफिसमध्ये आलो. सदर ठिकाणी श्री.बुधवंत सा◌ो यांनी सापळा कारवाई पुर्ण केली आहे. त्यावेळी त्याचे नाव जयवंत शंकर पाटील, रा.योगेश्वरी कालनी, पाचगांव रोड,कोल्हापूर असे असून तो सीपीआर हास्पीटल कोल्हापूर येथे भांडारपाल असलेचे समजले.तरी जयवंत शंकर पाटील, भांडारपाल, सीपीआर हास्पीटल कोल्हापूर यांनी सी.पी.आर.हास्पीटल, कोल्हापूर येथे मृतदेहांसाठी आवश्यक असणारे सफेद मांजरपाट कापड पुरवठा केलेबाबतचे बील मंजूरीसाठी कोषागार कार्यालय कोल्हापूर येथे पाठविलेबाबत व हास्पीटलसाठी आवश्यक असणारे कपडे, इतर साहीत्य पुरविणेची आर्डर देणेसाठी रु.4,00,000/- रक्कमेची मागणी करुन त्यापैकी रु.1,00,000/- रक्कम दि. 06/08/2019 रोजी फोन करुन घेवून येणेस सांगितले. तसेच आज दिनांक 06/08/2019 रोजी सी.पी.आर.हास्पीटल कोल्हापूर येथे जयवंत पाटील यांनी माझेकडून रु.1,00,000/-लाच रक्कम स्विकारली असता श्री.बुधवंत व एसीबी सापळा पथकाने त्यांना पकडले आहे. त्याबाबत माझी जयवंत शंकर पाटील, भांडारपाल, सीपीआर हास्पीटल कोल्हापूर यांचेविरुध्द फिर्याद आहे. समक्ष

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): VASANTRAO DADASO BABAR(I (Inspector)) / PBMH75973 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANTRAO DADASO BABAR

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH75973

ठाणे अमलदार
लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे